नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. ०१ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## मनोज जरांगेंनी यांचे उपोषण मागे

जालना : (स. गांवकरी)

मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी आमरण उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडवण्यात राज्य सरकारच्या शिष्टमंडळाला यश आलं आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप आमदार प्रसाद लाड रात्री 1 वाजून 40 मिनिटाला जरांगे यांच्या भेटीसाठी दाखल झाले होते. यावेळी सरकारने सर्व मागण्या मान्य केल्यानंतर अखेर जरांगे पाटील उपोषण स्थगित करण्यास तयार झाले. मध्यरात्री सुमारे एक तासभर चर्चा केल्याच्या नंतर समाजबांधवांशी संवाद साधत मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाला स्थगिती देत असल्याची घोषणा केली. त्यानंतर 'एक मराठा, लाख मराठा'ची जोरदार घोषणाबाजी झाली आणि जरांगे पाटील यांनी आपले उपोषण स्थगित केले. ज्या मागण्या जरांगे पाटील यांनी सरकारकडे केल्या होत्या त्या तात्काळ पूर्ण करणार असल्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आश्वस्त केलं आहे. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी सरकारच्या वतीने मंत्री राधाकृष्ण विखे पाटील अंतरवाली सराटी येथे दाखल झाले. मात्र केवळ चर्चा नको, तर ठोस निर्णय हवा, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली. त्यानंतर



संबंधित अधिकाऱ्यांशी व सरकारशी चर्चा करून पुन्हा संध्याकाळी येण्याचे आश्वासन देत विखे पाटील छत्रपती संभाजीनगरकडे रवाना झाले. मनोज जरांगे हे रखरखत्या उन्हात उपोषणाला बसल्याने राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो मराठा समाज बांधव अंतरवाली सराटी येथे दाखल झाले आणि त्यांनी आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. अखेर रात्री उशिरा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड हे अंतरवाली सराटी येथे दाखल झाले. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी सरकारपुढे ठेवलेल्या 12 प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मराठा आंदोलनादरम्यान समाजबांधवांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेणे, सातारा संस्थान गॅझेट, हैदराबाद गॅझेटसंदर्भातील मागण्या तसेच राज्यामध्ये 58 लाख नोंदी मराठा समाज बांधवांच्या कुणबी असल्याच्या सापडल्या असल्याचा सरकारचा आकडा आहे, मात्र प्रत्यक्षात प्रमाणपत्र दिले जात नाही आणि ज्यांना प्रमाणपत्र दिले आहे, त्यांना प्रमाणपत्र व्हॅलिडिटी मिळत नाही , ओबीसी मधून नोकऱ्या मिळालेल्या मुलांना अद्याप संबंधित विभागाने रुजू करून घेतलेलं नाही , यासारख्या इतर विविध मागण्या सरकारसमोर जरांगे पाटील यांनी मांडल्या व त्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या सर्व मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले. सुमारे 1 तास चाललेल्या चर्चेनंतर मागण्यांबाबत लेखी आश्वासन सरकारच्या वतीने देण्यात आले आणि त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा अभ्यासक आणि उपस्थित समाजबांधवांशी चर्चा करून उपोषण स्थगित करण्याची घोषणा मध्यरात्री 1वाजून 40 मिनिटांनी केली.




## अकोले तालुक्याच्या जलक्रांतीचे प्रणेते

# स्व. मधुकरराव पिचड



■ शब्दांकन ■

डॉ. विश्वासराव आरोटे सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई

अकोले तालुक्याच्या भूमीशी इमान राखून आकाशात उंच झेपावणार्या पर्वत रांगांनी येथील सामान्य माणसांच्या मूर्ती घडविल्या आणि जोपासल्याही. आपल्या मातीशी इमान राखणाऱ्या रवृत्तीमधून दिशाहीन वाऱ्याचा वेध घेण्याची शिकवण रर्वतरांगांनी येथील भूमिपुत्रांना करून दिली. मुळा * प्रवरा या दोन्ही गंगोत्रीच्या कवेत मानवाच्या संस्कृतीचे जतन केले जात असताना काळ्या गडद अंधारात माणसं भांबावून वर्तमानातच थबकत होती. परंतु याच वेळी अज्ञानरूपी पडदा बाजूला प्रारणारी माणसंही जन्माला घातली गेली आपल्या कार्यकुशलतेच्या रूपाने त्यांनी जनताजनार्दन आणि व्यांच्या समस्या यांच्याशी एकरूप होऊन आयुष्याची कारकिर्द चालविली अशापैकी एक व्यक्तिमत्त्व म्हणजे नालुक्याचे भाग्यविधाते माजी मंत्री वंदनीय स्व. मधुकरराव पिचड साहेब हे होय.

स्व. मधुकरराव पिचड साहेब यांचा जन्म १ गुन १९४१ रोजी आदिवासी खेड्यात झाला शालेय जीवनापासूनच त्यांनी राजकारणाचे धडे गिरवायला सुरवात करून आपल्या आदिवासी बांधवांसाठी नव्हे तर तालुक्यातील जनतेसाठी अहोरात्र झटून विकास साधण्याचा ग्यत्न केला. अकोले तालुका म्हणजे मागासलेला तालुका अशीच तालुक्याची ओळख होती त्यामुळे मोठ्या प्रमाणात आदिवासींचे शोषण होत असे. परंतु पिचड साहेबांना या सर्व गोष्टींची चीड होती. जेव्हा पिचड साहेब पंचायत समितीचे सभापती झाले तेव्हा त्यांनी या गोष्टींना वाचा फोडून आदिवासींचे शोषण थांबवायला सुरुवात केली तेव्हापासून अकोले तालुक्याचा विकासाचा पाया घातला गेला.

१९७२ सालच्या मिषन दुष्काळात गोरगरीब जनतेच्या पाठीशी खंबीरपणे ऊभे राहून आदिवासींना दुष्काळातून मुक्ती मिळावी म्हणून राजकारणात खऱ्या अर्थाने प्रवेश केला. * पंचायत समिती सभापती, अगस्ती साखर कारखान्याचे चेअरमन, विरोधी पक्षनेता, पालकमंत्री, आदिवासी विकास मंत्री, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अशा विविध कार्याचा पदभार सांभाळत साहेबांनी विकासाची गंगा तालुक्याच्या कानाकोपऱ्यात नेली. स्वातंत्र्यानंतर तालुक्यातील गावे विकासापासून कोसो दुर होती. दळणवळणाची साधने नव्हती म्हणजेच खेड्यांच्या रक्तवाहिन्या समजल्या जाणाऱ्या रस्ते तालुक्यात नव्हते याची प्रकर्षाने जाणीव झाली त्यामुळे दुष्काळातही मोठ्या प्रमाणात सभापती म्हणून रस्त्याच्या कामांना मंजुरी मिळवुन कामे सुरू केली. आणि मग साहेबांना त्यांच्या कार्याची पहिली पावती जनतेने सादर केली. व साहेबांना प्रचंड मताधिक्क्याने विधानसभेत पाठविले. समाजकारणाची गोडवे गाणारा एक अभ्यासू कार्यकर्ता

राजकारणात बंदिस्त झाला आणि तालुक्याच्या विकासाला दिशा मिळाली. कळसुबाई, रतनगड, हरिश्चंद्रगड, कोंबड किल्लूयापर्यंत पसरलेल्या पर्वतरांगांनी आपल्या सान्निध्यात निसर्गाचे रूप जतन करून ठेवले त्याच प्रमाणे पाण्याची समृद्धी याच पर्वतरांगांमधून झाली परंतु येथे उगम पावणाऱ्या नद्यांचे पाणी वाहून जाऊन संगमनेर, श्रीरामपुर तालुक्यातील समृद्धी उदयास आली. हक्काचं पाणी तालुक्यातील जनतेला मिळावे म्हणून साहेबांनी मुळा खोऱ्यात अंबित, कोथळे, बलठण, देवहंडी, पिंपळगाव खांड, शिळवंडी, घोटी, सिसवद, खडकी, तर प्रवरा खोऱ्यात निळवंडे, सांगवी, टिटवी, वाकी तर आढळा खोऱ्यातही छोटे, मोठे धरणे, कोल्हापुरी बंधारे बांधुन पाणी अडविण्यास सुरुवात केली. मुळा बारमाहीचा संकल्प केला आणि तालुक्यातील शेतकरी समृद्ध बनत चालला साहेबांच्या कार्यमालेत राज्याला आणि तालुक्याला दिशा देणारी चळवळ म्हणजे अगस्ती सहकारी साखर कारखाना होय. साहेबांनी पाहीलेलं स्वप्न होते की आपल्या तालुक्यात एखादा सहकारी तत्वावर साखर कारखाना सुरू करावा. आणि तत्कालीन मुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी परवानगी देऊन अवघ्या अकरा महिन्यात साखर कारखाना उभारणी करून तालुक्यात क्रांती घडविली. शेतकऱ्यांचा विकास व्हायचा असेल तर आर्थिक उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे शेतीचे उत्पन्न घेत असताना जोडधंदा म्हणून दूध धंद्याला चालना देण्यासाठी गाई म्हशीचे वाटप करून दूध धंदा वाढवायला सुरवात केली दुधाला योग्य भाव देऊन आर्थिक पाठबळ प्रबळ केले पुढे अमृतसागर या नावाने सुरू केलेली संस्था तालुक्याची कामधेनु बनली.


आर्थिक दृष्ट्या प्रबळ असलेली जनता बऱ्याच प्रमाणात अज्ञानी होती याचे कारण निरक्षरता होय त्यांच्या अडाणीपणाचा इतर लोक फायदा घ्यायचे त्यांची शिक्षणाची अडचण दुर झाली पाहिजे आणि शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाले पाहिजे आदिवासींना जवळ व मोफत शिक्षणाची सुविधा व्हावी म्हणून राजूर या ठिकाणी आदिवासी उन्नती सेवा मंडळाची स्थापना केली आज या ज्ञानरूपी रोपट्याचे विशाल वृक्षात रूपांतर झाले आहे.

**एकुणच अकोले तालुक्याचा आलेख पाहिला तर पिचड साहेब यांची यांची कारकिर्द आणि तालुक्याचा विकास असेच समीकरण बघायला मिळते. तालुक्याला मिळालेली विकासाची दिशा ही साहेबांच्या दुरदृष्टीतुन मिळालेली आहे हे नाकारून चालणार नाही. अशा या लोकभिमुख स्मृती व नेतृत्वाच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन....**












# समाजाला दिशा देणारे व्यक्तीमत्व प्रा. बबनराव महाले सर

बेलापूर बदगी (ता. अकोले) मुळ गाब असलेल्या प्रा. बी. एम. महाले सरांचे व्यक्तीमत्व घडत असताना त्यांनी त्यांचे ध्येय्व जवळपास निश्चित केले होते आणि म्हणूनच बी. ए. ही पदवी त्यांनी विद्यापीठात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन मिळविली व त्यावेळचे ते बहुजन समाजातील पहिले गोल्ड मिडलिस्ट ठरले. त्यांना नॅशनल स्कॉलर दिल्ली, महाराष्ट्रीय सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर त्यांनी अकोले महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख म्हणून ३५ वर्षे सेवा पूर्ण केली. प्राध्यापक म्हणून काम करीत असताना त्यांनी स्वतःची काही तत्वे जोपासली. विद्यार्थी केंद्रबिंदू मानला म्हणून ते विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय आहेत. पूणे विद्यापीठ प्राध्यापक महासंघाचे (पुक्टो) ते सरचिटणीस व नंतर अध्यक्ष माणून त्यांनी काम पाहिले. त्यांच्या कार्यकाळात प्राध्यापकांच्या अनेक समस्या दूर झाल्या, प्राध्यापक हा समाजाचे काही देणे लागतो हा विचार ठेऊन समाजाला दिशा देण्याचे काम करताना त्यांनी अकोले तालुक्याच्या शिक्षण, समाज, कला व अर्थकारणात सक्रीय भाग घेऊन चांगले योगदान दिले. त्यांनी पुरुषोत्तम करंडक, पूर्ण विद्यापीठ युवक महोत्सवात अनेक एकांकीका सादर केल्या. या एकांकीकेचे लेखन व दिग्दर्शन यात त्यांची महत्वपूर्ण भूमिका होती. अकोले तालुका एज्युकेशन संस्थेच्या शैक्षणिक क्रांतीतही त्यांचे योगदान महत्वाचे आहे.



समाजाला एक विचार मिळाला पाहिजे या भावनेतून प्रेरीत होऊन त्यांनी 'सापेक्ष' हे पाक्षिक सुरु केले, त्याचे ते संस्थापक असून त्यांनी संपादक म्हणून कार्य केले आहे. समाजातील तरुणांना स्वयंरोजगार सुरु करता यावा तसेच शेतीच्या माध्यमातून विकास साधता यावा म्हणून अर्थकारणात महत्वाचा वाटा उचलणाऱ्या सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून त्यांनी अनेकांना कर्जपुरवठा करुन त्यांच्या विकासात सहभाग नोंदविला. त्यासाठी त्यांनी अकोले तालुका शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी

पतसंस्था मर्या: अकोले स्थापन केली. या संस्थेचे ते संस्थापक चेअरमन होते. त्यानंतर त्यांनी अर्थवेद सा. वि. शेती. सह. पतसंस्थेची स्थापना करून ती तालुक्यात नावारुपाला आणली. स्थापनेपासून ते आजतागायत संस्थापक चेअरमन माणून कार्यरत आहेत. समाजकारण, अर्थकारण क्षेत्रात कार्यरत असताना के, अंद. आर. एम. महाले यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना प्रा. महाले सरांचे बेलापूर बदगी येथील विविध सहकारी संस्थांच्या उभारणीत महत्वाचे योगदान आहे.के. अॅड. आर. एम. महाले यांचे अध्यक्षते खाली स्थापन झालेल्या कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण संस्था अकोले (संगमनेर) या संस्थेचे संस्थापक सचिव म्हणून काम करताना प्रा. महाले यांनी अकोले तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात काम करताना अनेक विद्यालये आदिवासी दुर्गम भागात सुरु करुन तेथील मुलामुलींच्या शिक्षणाची सोय केली. त्यात कोभाळणे, पिंपरकणे, टाहाकारी, माळेगाव व पिंपळगाव निपाणी या गावांचा समावेश आहे.

अकोले तालुका हा पूर्वी निरक्षर लोकांचा असल्याने त्यावेळी समाजावर अंधश्रध्देचा पगडा होता. त्यामुळे अनेक जण या अंधश्रध्देला बळी पडत होते. हे पाहून प्रा. महाले यांनी अकोले तालुका अंधश्रध्दा निर्मूलन समिती स्थापन करुन तीचे कार्याध्यक्ष माणून चांगले काम केले. तालुक्यात विविध चळवळी व आंदोलनामध्ये त्यांनी सहभाग घेतला असे हे अष्टपैलू व्यक्तीमत्व पडत असताना त्यांच्या या सर्व वाटचालीत अकोले तालुक्याचे आमदार मधुकर पिचड यांचा सिंहाचा वाटा असून ते नोकरीतून जरी निवृत्त झाले असले तरी सामाजिक जीवनात सातत्याने चांगले काम करीत आहेत.

–शब्दांकन : डॉ. विश्वासराव आरोटे











अकोले तालुक्याचे भाग्यविधाते

जलक्रांतीचे जनक, माजी मंत्री

# स्व.मधुकररावजी पिचड साहेब

## ८४ व्या जयंती निमित्त



# विनम्र अभिवादन..!



मा.श्री.वैभवराव पिचड

(चेअरमन)

दुध अगस्तीचे...

आरोग्य कुटूंबाचे

पाश्चराईज्ड व होमोनाईज्ड दुध



मा.श्री.रावसाहेब रामराव वाकचौरे

(व्हा.चेअरमन)



मा.श्री.दादाभाऊ गणपत सावंत

(कार्यकारी संचालक)

आमची खालील दर्जेदार, शुद्ध व सकस उत्पादने 'अगस्ति' ब्रॅण्डनेमने सर्वदूर विक्रीस उपलब्ध आहेत.




सन्माननीय संचालक मंडळ

श्री.आनंदराव वाकचौरे, श्री.आप्पासाहेब आवारी, श्री.रामदास आंबरे, श्री.जगनशेठ देशमुख, श्री.अरुण गायकर, श्री.गंगाधर नाईकवाडी, श्री.सुभाष डोंगरे, श्री.बाबुराव बेणके, श्री.गोरक्ष मालुंजकर, श्री.शरदराव चौधरी, सौ.अश्विनी धुमाळ, सौ.सुलोचैन्ना औटी

तज्ञ संचालक : श्री. दयानंद वैद्य, श्री. बाळासाहेब मुंढे

गायीचे शुद्ध व सकस अगस्ति तूप ● निर्भळ, निर्जंतुक, पाश्चराईज अगस्ति दूध ● दही ● लस्सी ● ताक ● श्रीखंड ● आम्रखंड ● पेढा ● खवा ● मलई ● पनीर

## अमृतसागर सहकारी दुध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या; अकोले

---

माजी आदिवासी विकास मंत्री तथा

अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे कार्यकारी विश्वस्त

# स्व. मधुकररावजी पिचड साहेब



## यांच्या स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन...!





।। साहसे श्रीः प्रतिवसति ।।

## अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले

ता.अकोले, जि.अहमदनगर

मा.श्री.वैभवराव पिचड

(कायम विश्वस्त)



मा.श्री.धनंजय संत

खजिनदार



मा.श्री.गिरीजाजी जाधव

(कायम विश्वस्त)

मा.श्री.मधुकरराव सोनवणे — स्वीकृत विश्वस्त

मा. श्री. सुरेशराव कोते — स्वीकृत विश्वस्त

मा.श्री.संपतराव वैद्य — स्वीकृत विश्वस्त

सन्माननीय कार्यकारिणी

मा. डॉ. दामोधर कारभारी सहाणे (सदस्य)

मा. श्री. यशवंतराव दशरथ आभाळे (सदस्य)

मा. ॲड. आनंदराव निवृत्ती नवले (सदस्य)

मा. श्रीमती कल्पनाताई अजित सुरपुरिया (सदस्य)

मा. श्री. सुधाकर काशिनाथ आरोटे (सदस्य)

मा. श्री. रमेशराव हरिभाऊ जगताप (सदस्य)

मा. श्री. शरदराव विश्वासराव देशमुख (सदस्य)

मा. श्री. मच्छिंद्र पांडुरंग धुमाळ (सदस्य)

मा. श्री. संपतराव पांडुरंग मालुंजकर (शिक्षणाधिकारी)



मा.श्री.सुधाकर देशमुख

सेक्रेटरी



मा.श्री.सुनिल दातीर

अध्यक्ष

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)